

# पुस्तकाच्या जगात रंगले की लोकांच्या संवेदना कळतात : डॉ.वैशाली पांडे

**विदर्भ मतदार प्रतिनिधी**

**पुसद :** लेखक म्हटलं की तो प्रतिभा संपन्न असतो कारण लेखकांकडे प्रतिभा निरीक्षण या गोष्टी असतातच त्याला योग्य भूमिकेत शिरावे लागते जगातल्या बारीक सारीक गोष्टीचे निरीक्षण करावे लागते विद्यार्थिनींना प्रतिभा साठी वाचन आणि लेखन आवश्यक आहे स्वतःचे विचार व्यक्त करता आले पाहिजे, ते लिहून काढता आले पाहिजे, चांगलं शुद्ध प्रमाण बोलता आलं पाहिजे, शिकतय आलं पाहिजे, हे केव्हा होईल त्यासाठी वाचन आवश्यक आहे पुस्तकाच्या माध्यमातूनच शुद्ध बोलता येते आणि लिहिता पण येते आणि भाषा देखील सुधारते साहित्य कसा जगावे हे शिकवते पुस्तकाचा वेड लागलं पाहिजे. वाचनाचे फार चांगले संस्कार होत असतात भिंती पत्रकाचे माध्यमातून वासल्य नियतकालिकाचे माध्यमातून आपण अभिव्यक्त होत असतात पुस्तकाच्या सहवासात रहा पुस्तकाच्या जगात रंगले की तुम्हाला लोकांच्या वेदना संवेदना करतात असे मत श्रीमती वसलाबाई नाईक महिला महाविद्यालयाच्या संस्कृत विभाग प्रमुख वैशाली पांडे यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाच्याप्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.छाया कोकाटे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.वैशाली पांडे, वाचन संकल्प महाराष्ट्राच्या समन्वयक डॉ. अर्चना भोयर, डॉ. स्वप्ना देशमुख, प्रा. दीप्ती कुबडे, डॉ. वर्षा गारूळे विचारबंच वर उपस्थित होते उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रद्धेय श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले डॉक्टर वैशाली पांडे विद्यार्थिनीशी संवाद साधत असताना म्हणाल्यात, साहित्याच्या माध्यमातूनच माणसाच्या व्यथा वेदना संवेदना करतात. त्यासाठी वाचन महत्त्वाचा आहे आपण जितकं जास्त वाचन कराल तितके महत्त्वाचे आहे माणसाची बोलीभाषा त्याची प्रतिभा त्याची भुमी भूमिका ह्या सर्व गोष्टी वाचनामुळे प्राप्त होतात. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा प्रास्ताविक डॉ.अर्चना भोयर, आभार प्रदर्शन डॉ.स्वप्ना देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. अमित सुरजुशे, प्रा.विक्रांत मेश्राम, प्रा. प्रवीण पाऊलबुद्धे, प्रा. आकाश ताविडे , प्रा.रमेश नगराळे ग्रंथालयाचे श्री प्रमोद मुकीरवार, ग्रंथालय कर्मचारी पार्वती धुळे, कोमल पायघन, सुशीला जाधव याप्रसंगी उपस्थित होते.

# महिला महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अभिवादन कार्यक्रम



**विदर्भ मतदार प्रतिनिधी**

**पुसदः** ज्या व्यवस्थेने स्त्रियांचे मूलभूत अधिकार नाकारले होते, शिक्षणाचे हक्क नाकारले होते, अशा परिस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी परिस्थिती विपरीत असताना देखील देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि स्त्रियांना शिक्षणाचे अधिकार मिळवून दिले. आज जगातील ज्या काही स्त्रियांनी प्रगती केले ते केवळ आणि केवळ म्हणजे सावित्रीबाई फुले मुळे, असे वक्तव्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व बालिका दिनानिमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. छाया कोकाटे यांनी अभिवादन कार्यक्रमाचे प्रसंगी व्यक्त केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थिनी मंडळ तसेच मराठी विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भिंती पत्रक (पोस्टर प्रेझेंटेशन) च्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी गीताई केंद्राच्या प्रशिक्षक श्रीमती शैलाताई सावंत यांनी स्त्री आत्मपरीक्षणपर पोस्टरची प्रदर्शनी ग्रंथालयामध्ये लावण्यात आली. सोबतच कु. अलका संतोष वारकड, कु. प्रणाली राजेश गावंडे, कु. पायल नागेंद्र शिंदे, कु. नंदिनी संजय खरात, कु. आकांक्षा सचिन बडप, कु. प्रीती राजेंद्र फोले, कु. मनीषा वामन शामसुंदर, कु. शिवकन्या राठोड या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाडा या अंतर्गत मुलींचे वाचन प्रा. डॉ. अर्चना भोयर यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले.

प्रा. डॉ. रंजना जीवने गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी बालिका दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा प्रदान केल्यात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा प्रस्ताविक विद्यार्थिनी मंडळाच्या समन्वयक प्रा. डॉ. स्वप्ना देशमुख यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सरिता चंदनकर यांनी केले. तर मराठी विभागाच्या वतीने प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम (मराठी विभाग प्रमुख), प्रा. प्रवीण पाऊलबुंदे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाशी निगडित भिंती पत्रकाचे प्रदर्शन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी करिता केले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त महाविद्यालयात विविध विभागाच्या माध्यमातून जे उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा प्रचंड सहभाग लाभला.

6/1/2025 मतदार

# श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे उद्‌घाटन



**विदर्भ मतदार प्रतिनिधी**

**पुसद** : दि. १ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाचा अभिनव उपक्रम वाचन संकल्प महाराष्ट्राचा याचे उद्घाटन दि. १ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. छाया कोकाटे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी त्यांच्या आवडीच्या पुस्तक वाचण्याचा आनंद घेतला. या प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ.छाया कोकाटे, प्रा. डॉ. अर्चना भोयर, डॉ. रविचापके, प्रा डॉ. वैशाली पांडे, डॉ. रंजना जिवने, प्रा. संजय सुपे, डॉ. स्वप्ना देशमुख, प्रा. अनुश्री पूरी, प्रमोद मुकिरवर, पार्वती धुळे, सुशीला जाधवआणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.